संस्थापक - नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

रोखठोक बेधडक

संपादकीय.....

।। न मे भक्त : प्रणश्यति ।।

# डिजीटल गुणपत्रिका क्रांतिकारी पाऊल

सध्याचे जग हे डिजीटल युग मानले जाते. दैनंदिन किंवा एकूण चालणाऱ्या व्यवहारामध्ये तंत्रज्ञानाचा आणि त्यातही संगणक किंवा माहिती तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर होत असतो. ज्या गोष्टी करण्यासाठी काही दिवस काही महिने काही वेळा तर काही वर्षे वाट पहावी लागत असे. विशेषतः कागदपत्र सादर करण्यापासून सरकारी कार्यालयातून एखादे कागदपत्र मिळवण्यापर्यंत या वेळ खर्च करणाऱ्या अनेक प्रक्रिया पूर्ण कराव्या लागत असत. तंत्रज्ञानाने या सर्वांचे स्वरूप बदलून टाकले आहे. आता या डिजीटल क्रांतीमुळे काही वर्षे तर सोडाच परंतु काही मिनीटेसुध्दा वाट पहावी लागत नाही.जगाच्या सर्व प्रगत देशांनी या डिजीटल तंत्रज्ञानाचा इतक्या वेगाने आणि झपाट्याने वापर केला आहे की त्यांना आता अतिप्रगत देश म्हणावे लागत आहे. संगणक, फेसबुक, इंटरनेट, मोबाईल व्हॉटसअप ही तर या डिजीटल क्रांतीमधली महत्वाची साधने आहेतच.परंतु आता यापेक्षाही अधिक वेगवान आणि अधिक परफेक्ट तंत्र विकसित झाल्याने एकूणच मनुष्याची शक्ती,पैसा आणि वेळ याची मोठी बचत होऊ लागली आहे. भारतासारख्या विकसनशिल देशात अजून पाहिजे तसा प्रसार झाला नसला तरी तो होण्यासाठी जोरदार प्रयत्न सुरू झाले आहेत. प्रामुख्याने आपल्या देशातील शासकीय निमशासकीय,कॉर्पोरेट आणि त्यातही शिक्षण क्षेत्रात जर या डिजीटलरुपी साधनांचा अधिकाधिक वापर झाला तर आपल्यालाही अन्य प्रगत देशांच्या रांगेत जाऊन बसायला वेळ लागणार नाही. सरकारला हवी ती कामे किंवा लोकांच्या काही गरजा या तंत्रज्ञानाचा वापर करून पूर्ण होऊ शकतात. ज्याप्रमाणे आज घरबसल्या अनेकांना बस रेल्वे,विमान एवढेच काय तर सिनेमाची तिकिटे नेटवरून मागवता येतात. शासकीय पातळीवरुन मिळणारे अनेक दाखले प्रमाणपत्र मिळवण्यासाठी रांगेत उभे राहून पैसे खाऊ घालावे लागत असत आता हळूहळू तिथेही संगणकाचा वापर सुरू झाल्याने तिथे रांगा लावण्याची किंवा आपला वेळ वाया घालवण्याची गरज उरणार नाही.मात्र या तंत्रज्ञानाचा प्रसार अधिक वेगाने झाला पाहिजे. अशाच एका सुविधेपैकी विद्यार्थ्यांची एक मोठी अडचण सोडवण्यासाठी या डिजीटल साधनांचा उपयोग केला जाणार आहे. पुढील वर्षापासून दहावी आणि बारावीचे मार्कशिट्स हे ऑनलाईन किंवा नेटद्वारे विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्याची तयारी सुरु आहे. सध्या विद्यार्थ्यांना निकाल लागल्यानंतर हे मार्कशिटस अर्थात गुणपत्रिका घेण्यासाठी शाळेत किंवा महाविद्यालयात जावे लागते.आता सरकारच्या वेब पोर्टलवर त्या गुणपत्रिका उपलब्ध करून दिल्या जातील. आणि विद्यार्थी निकाल लागल्यानंतर लगेचच त्याची फोटो कॉपी काढू शकेल.अर्थात यासाठी काही पध्दत ठरविली जात आहे. ज्यात ही गुणपत्रिका मिळवण्यासाठी विद्यार्थ्याने पोर्टलवरच्या पानावर आपला अनुक्रमांक किंवा परीक्षा क्रमांक नोंदवल्यानंतर ही गुणपत्रिका मिळवता येईल. मात्र याबरोबर कोणत्याही एका विषयात मिळवलेले गुणदेखील पोर्टलवरच्या अर्जावर टाकावे लागणार आहेत.या निकालाच्यावेळी कोणत्या विषयात किती गुण मिळाले हे कळते. त्यापैकी एका विषयाचे गुण नोंदवून गुणपत्रिका लगेच मिळण्याची सोय होणार आहे.

## लाचखोरी थांबेल

डिजीटल सुविधेचा केवळ एवढाच उपयोग नाही तर अनेक मोठमोठी कामे, प्रस्ताव, निविदा, दस्तावेज या सगळ्या गोष्टी डिजीटल स्वरुपात प्राप्त करता येतील. किंवा सादरही करता येतील. ज्यासाठी कागदपत्रे खर्च करावी लागत होती. त्याबाबतच्या फायली सादर करण्यासाठी त्या त्या कार्यालयात अनेक फेऱ्या माराव्या लागतात. साधा एक अर्ज सादर करण्यासाठी जिल्हा, तालुक्याच्या ठिकाणी हा प्रकार करूनही कामे होत नाहीत. शिवाय ही कामे करण्यासाठी पैसे मागितले जातात. भ्रष्टाचाराला लाचखोरी याकरता लोकांना वेठीला धरण्याचे काम सरकारी कार्यालयांमध्ये अजूनही होते. जी गोष्ट सरकारी कामाचा अनिवार्य भाग असतो. लोकांना हव्या त्या गोष्टी पुरवणे ही सरकारी कार्यालयाची जबाबदारी असते. त्यासाठी पैसे मागण्याचा प्रकार सर्रासपणे चालतो. डिजीटल सेवेमुळे या बदमाशगिरीला काही प्रमाणात आळा बसणार आहे. आपल्या देशात आणि राज्यातसुध्दा अशा काही कायदेशीर गोष्टी किंवा नियम आहेत की, ज्यामुळे लोकांची सोय होण्याऐवजी गैरसोयच जास्त होते. त्यातून विद्यार्थ्यांची सुटका होत नाही. अनेक अर्ज करताना त्याच्या झेरॉक्सप्रती सादर केल्या जातात. परंतु त्या झेरॉक्स प्रतींची अधिकृतता नक्की करण्यासाठी कोणत्या तरी सक्षम अधिकाऱ्याची स्वाक्षरी आवश्यक असते. अनेक जण याबाबत खोटी कागदपत्रे सादर करण्याची शक्यता असते. म्हणून ही काळजी घेतली जाते. परंतु काहीवेळा या अधिकृततेची सही घेण्यासाठी संबंधित विशेष न्यायदंडाधिकारी प्राचार्य एखादा अ वर्गातला सरकारी अधिकाऱ्यांकडे विद्यार्थ्यांना फेऱ्या माराव्या लागतात. खरे तर याबाबत आणखी वेगळी उपाययोजना यापूर्वीच व्हायला हवी होती. ती झाली नाही आता या डिजीटलमुळे झेरॉक्स प्रतीवर सह्या घेण्याची झंझट कायमची बंद होऊ शकते. कारण संबंधित संस्था किंवा व्यक्ती ते प्रमाणपत्र अथवा गुणपत्रक त्याबाबतच्या वेबसाईटवर प्रत्यक्ष पाहू शकते. आणि झेरॉक्स प्रतीची खातरजमा करू शकते. म्हणजे निकाल लागल्यानंतर गुणपत्रिकांच्या झेरॉक्स प्रतीवर सह्या घेण्यासाठी होणारे विद्यार्थ्यांचा कष्ट आता वाचू शकतात. नेटद्वारे मिळणारे गुणपत्रक यापुढे विद्यार्थ्यांची ही फार मोठी सोय करणारे ठरणार आहे.

## जिवंत असल्याचा असाही पुरावा

नवे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी डिजीटल इंडिया अशी घोषणाच केली आहे. समाजातले सरकारमधले अधिकाधिक व्यवहार कामे ही संगणक किंवा इंटरनेटद्वारे करण्यावर त्यांचा भर आहे. आज सगळ्याच मोठ्या देशात सामान्य माणसाला या डिजीटलायझेशनचा मोठा फायदा होतो. अनेक आर्थिक व्यवहार तो नेटबँकिंगद्वारे करतो. एकमेकांशी संपर्क, संवाद किंवा अगदी विचारांची देवाणघेवाण तो तंत्रज्ञानाच्या माध्यमातून करतो. भारतात या डिजीटल व्यवहाराचा वेगाने विकास आणि प्रसार झाला पाहिजे. यामुळे होणारे फायदे अनेक स्वरूपाचे आहे. एक म्हणजे मनुष्याचे श्रम,पैसा,वेळ या तीन गोष्टींची बचत तर होतेच याशिवाय त्याला आपल्या बुध्दीचा वेळेचा, पैशाचा अधिक सकारात्मक आणि विधायक कामांसाठी उपयोग करता येतो. जसे विद्यार्थ्याला जर गुणपत्रक घरबसल्या मिळाले तर तो आपला वेळ अभ्यासासाठी देऊ शकतो. शेतकऱ्याला सातबाराचा उतारा जन्माचा, मृत्यूचा दाखला, विवाह नोंदणी दाखला.अशा अनेक गोष्टी नेटवर मिळाल्या तर सरकारी कार्यालयात होणारी गर्दी कमी होईल. लोकांचा आणि कर्मचाऱ्यांचाही वेळ वाचेल.आज हे डिजीटलायझेशन नसल्यामुळे कसा बारभाई कारभार चालतो याचे एक उदाहरण म्हणजे पेन्शन घेण्यासाठी निवृत्तीधारकांची होणारी ससेहोलपट म्हणता येईल.त्या निवृत्तीधारकांना वर्षातून एकदा त्या बँकेत जाऊन स्वतः जिवंत असल्याचे सांगावे लागते. आता दहा पाच हजाराची पेन्शन मिळवण्यासाठी सादर करावे लागणारे लाईफ सर्टिफिकेट म्हणजे समाजावरचा अविश्वास तर असतोच. परंतु ती व्यक्ती जीवंत आहे याची खातरजमा करण्याचा हा अफलातून सरकारी प्रकाराचा उत्तम नमुना ठरतो. हा वायफळ कारभार थोपवण्यासाठी डिजीटलायझेशन अत्यंत उपयुक्त ठरेल यात काही शंका नाही.